वांगी लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान

आपल्या रोजच्या आहारामध्ये वांगी ही भाजी फारच महत्त्वाची आहे. कारण वांग्यामध्ये खनिजे तसेच अ, ब, क ही जीवनसत्वे, लोह व प्रथिने यांचे प्रमाण पुरेसे आहे. वांग्याचा आहारामध्ये भाजी, मसाला भरलेली वांगी, भरीत, दही वांगी असा अनेक प्रकारे उपयोग होतो. गरीबांपासून श्रीमंतापर्यंत, ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत सर्वांनाच लोकप्रिय असणारी आणि वर्षभर उपलब्ध होणारी वांगी ही सर्वसामान्य लोकांच्या आवडीची फळभाजी आहे. वांग्याचे मूळस्थान भारत असून बहुतेक सर्व राज्यांतून लागवड केली जाते.

भारतात प्रामुख्याने पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व इतर राज्यांमधून वांग्याची लागवड केली जाते. महाराष्ट्रात या पिकाखाली जवळजवळ ३०,००० हेक्टर क्षेत्र असून उत्पादन ६९०.० मे.टन व उत्पादकता ३०.० प्रति हेक्टर एवढी आहे. महाराष्ट्रात जवळजवळ सर्वच जिल्ह्यातून हे पीक घेतले जाते. परंतु विविध भागानुसार लोकांच्या आवडी विशिष्ट वांग्याच्या जातींसाठी वेगवेगळ्या आहेत. सांगली, सातारा भागात कृष्णाकाठी चविष्ट वांगी प्रसिद्ध आहेत. अहमदनगर, पुणे व सोलापूर भागात काटेरी किंवा डोरली वांगी जास्त पसंत केली जातात तर खानदेशात भरताची वांगी हा प्रकार अधिक लोकप्रिय असून विदर्भात कमी काटे असलेली वांगीच सर्वांना आवडतात. वांगी हे पीक जवळच्या तसेच लांबच्या बाजारपेठांना विक्रीकरता पाठविण्याच्या दृष्टीने हे एक बागायती पीक फायदेशीर देखील आहे.

वांग्याच्या लागवडीसाठी सुधारित किंवा संकरित वाण निवडताना ठराविक बाबींचा विचार करणे महत्त्वाचे असते. प्रामुख्याने त्या परिसरातील लोकांची मागणी असणारा वाण तसेच बाजारपेठेत हमखास चांगला भाव मिळणारा वाण निवडणे गरजेचे असते. निवडलेला वाण शक्यतो भरपूर उत्पादन देणारा व रोग आणि कीड यांना कमी प्रमाणात बळी पडणारा असावा व तेथील हवामानाशी मिळत-जुळतं घेणारा वाण निवडणे महत्त्वाचे असते. वांगी पिकाची लागवड करताना प्रामुख्याने सुधारित व संकरित जातीची निवड, रोपवाटिका व्यवस्थापन, लागवड पद्धत, खत व पाणी व्यवस्थापन व पीक संरक्षण या बाबी फारच महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्रात वांगी पिकाच्या बऱ्याच जातींची लागवड केली जाते. वेगवेगळ्या विभागात रंग व आकारानुसार तसेच काटेरी व बिनकाटेरी विविध जाती लावल्या जातात.

सुधारित व संकरित जाती :

मांजरी गोटा : या जातीचे फळ मध्यम ते मोठ्या आकाराचे, गोल असून जांभळट गुलाबी रंगाचे असते व त्यावर पांढरे सरमिसळ पट्टे असतात. फळांच्या देठावर काटे असतात ही जात चवीला रूचकर असून फळे चार ते पाच दिवस टिकू शकतात. या जातीचे सरासरी उत्पादन हेक्टरी २५० ते ३०० क्विंटल मिळू शकते.

कृष्णा : ही संकरीत जात असून झाडे काटक असतात. फळांचा आकार अंडाकृती, रंग आकर्षक जांभळा असून त्यावर पांढरे पट्टे असतात व फळांच्या देठावर व पानांवर काटे असतात. या जातीचे सरासरी ४०० ते ४५० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

फुले हरित : या जातीची फळे मोठ्या आकाराची असतात, ही जात भरीत करण्यासाठी चांगली आहे. या जातीच्या फळाचा रंग फिकट हिरवा व टोकाकडे पांढरे पट्टे असतात. ही जात खरीप हंगामासाठी चांगली आहे. या जातीचे सरासरी २०० ते ४८० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते. याशिवाय वांग्याच्या आणखी विविध जाती काही संस्थांनी तसेच खासगी कंपन्यांनी विकसित केल्या आहेत. काही जाती ठराविक भागातच चांगल्या मागणी असलेल्या असतात. वांग्याची शक्यतो आवडीनुसार जात निवडणे बाजारपेठेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते व निवडलेली जात शक्यतो कीड व रोगांना कमी प्रमाणात बळी पडणारी व भरघोस उत्पादन देणारी असावी म्हणजे बाजारभाव चांगले मिळून शेतकरी बांधवास चांगला फायदा होऊ शकतो.

हवामान : या पिकाला कोरडे आणि थंड हवामान चांगले मानवते. ढगाळ हवा आणि एकसारखा पडणारा पाऊस या पिकाला अनुकूल नाही. कारण अशा हवामानात कीड आणि रोगांचा फारच उपद्रव होतो. सरासरी १३ ते २१ सें.ग्रे. उष्ण तापमानात हे पीक चांगले येते. महाराष्ट्रातील हवामानात जवळजवळ वर्षभर वांग्याचे पीक घेता येऊ शकते.

जमीन : चांगला निचरा असलेली मध्यम काळी कसदार जमीन या पिकासाठी उत्तम समजली जाते. नदीकाठच्या गाळवट जमिनीत वांग्याचे भरपूर उत्पादन येते असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

लागवडीचा हंगाम :

महाराष्ट्रातील हवामानात वांगी पिकाची लागवड तिन्ही हंगामात करता येऊ शकते. खरीप हंगामासाठी बियांची पेरणी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात आणि रोपांची लागवड जुलै-ऑगस्टमध्ये केली जाते. रब्बी किंवा हिवाळी हंगामासाठी बियांची पेरणी सप्टेंबर अखेर करतात आणि रोपे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये लावतात. उन्हाळी हंगामासाठी बी जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पेरुन रोपांची लागवड फेब्रुवारीत केली जाते.

बियांचे प्रमाण : कमी वाढणाऱ्या जातीसाठी हेक्टरी ४०० ते ५०० ग्रॅम बी पुरेसे होते. जास्त वाढणाऱ्या किंवा संकरित जातीसाठी हेक्टरी १२० ते १५० ग्रॅम बी पुरेसे होते. पेरणीपूर्वी बियाण्यास प्रति किलो ३ ग्रॅम थायरम चोळावे.

जांभूळ प्रक्रियेच्या संधी

जांभळाच्या पिकलेल्या फळांमध्ये आहारमूल्य व औषधी गुणधर्म चांगले असल्याने फळांना बाजारपेठेत फार चांगली मागणी आहे. ही फळे अत्यंत नाजुक व नाशवंत असल्याने १ ते २ दिवसांपेक्षा जास्त साठवता येत नाहीत. बाजारात एकाच वेळी फळांची आवक जास्त झाली की त्याचे दर कोसळतात व शेतकऱ्यांना त्यांचा माल पडेल त्या भावाला विकल्याने त्याचा तोटा होतो. यासाठी फळांपासून विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार केल्यास औषधी गुणधर्माचा वापर होईल. हंगाम नसताना फळांचा आस्वाद घेता येईल व असे प्रक्रिया उद्योग खेडोपाडी उभारल्यास रोजगार निर्मिती होऊ शकेल. या फळांपासून आपणास रस, सरबत, स्क्वॅश, सिरप, वाईन, जॅन, जेली, बर्फी टॉफी, पावडर इत्यादी पदार्थांना बाजारपेठेत जास्त मागणी आहे. जांभळाच्या पिकलेल्या फळांना गर्द जांभळा रंग असल्याने त्यांच्यापासून तयार केलेल्या पेयाला आकर्षक रंग येतो. जांभळापासून विविध प्रकारची पेय तयार करता येतात उदा. सरबत, स्क्वॅश, सिरप.

जांभूळाचे सरबत : प्रथम पिकलेली व आकाराने मोठी फळे निवडावीत. स्वच्छ पाण्याने धुतल्यानंतर जांभळी पल्परच्या सहाय्याने त्याचा रस काढून घ्यावा. एकजीव झालेला गर स्टेनलेस स्टीलच्या पातेल्यात घेऊन ८२ अंश से. तापमानाला २० मिनिटे गरम करावा. यामुळे रसामधील रंगद्रव्याचे प्रमाण जास्त मिळते. रसामध्ये साखर, सायट्रीक ॲसिड, पाणी व परीरक्षक योग्य प्रमाणात घेऊन रसामध्ये मिसळून ते मिश्रण मलमलच्या कापडातून गाळून घ्यावे. नंतर हे मिश्रण थोडसे गरम करून निर्जंतूक केलेल्या काचेच्या बाटल्यात भरून हवाबंद करून लेबल लावून थंड किंवा कोरड्या जागेवर साठवून ठेवावे.

जांभूळाचे स्क्वॅश : जांभळाच्या फळांपासून स्क्वॅश तयार करण्यासाठी प्रथम पिकलेल्या निरोगी चांगल्या फळांची निवड करावी. फळे स्वच्छ पाण्याने धुतल्यानंतर पल्परच्या सहाय्याने त्याचा रस काढून घ्यावा. एकजीव झालेला गर स्टेनलेस स्टीलच्या पातेल्यात घेऊन ८० ते ८२ अंश से. तापमानाला ३० मिनिटे गरम करावा. यामुळे रसामधील रंगद्रव्याचे प्रमाण जास्त मिळते. रसामध्ये साखर, सायट्रीक ॲसिड, पाणी व परीरक्षक योग्य प्रमाणात घेऊन रसामध्ये मिसळून ते मिश्रण मलमलच्या कापडातून गाळून घ्यावे. नंतर हे मिश्रण थोडेसे गरम करून निर्जंतूक केलेल्या काचेच्या बाटल्यात भरून हवाबंद करून लेबल लावून थंड किंवा कोरड्या जागेवर साठवून ठेवावे.

जांभूळाच्या बियांची पावडर : जांभळाच्या फळांपासून गर व रस काढल्यानंतर राहिलेल्या बियांपासून पावडर तयार करता येते. ही पावडर मधुमेही रोग्यांसाठी अत्यंत गुणकारी असते. त्या पावडरला बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. गर काढून घेतल्यानंतर राहिलेल्या बिया पाण्याने स्वच्छ धुवून घ्याव्यात. त्या बिया ट्रे मध्ये पातळ पसरून ते ट्रे ड्रायरमध्ये ५५ ते ६० अंश से. तापमानास १८ ते २० तास ठेवावेत व उन्हात वाळवावेत. वाळलेल्या बिया मिक्सर किंवा ग्राईंडरच्या मदतीने पावडर तयार करावी. नंतर पावडरचे वजन करून पॉलीथिन पिशवीत भरून पिशव्या हवाबंद करून लेबल लावून कोरड्या जागी साठवून ठेवाव्यात.

हमखास उत्पन्न मिळवून देणारी निशिगंध लागवड

निशिगंध पिकाची लागवड सोपी असून, तिचा लागवड खर्चही कमी असतो. त्यामुळे हे पीक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे. मात्र निशिगंधाच्या भरपूर व उत्तम प्रतीच्या उत्पादनासाठी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. मे महिन्यात, उत्तम निचरा असलेल्या जमिनीत या पिकाची लागवड केल्यास दर्जेदार व भरपूर फुलोत्पादनाची खात्री देता येते. निशिगंध हे कंदवर्गीय फुलपीक असून, या झाडाला शुभ्र पांढरी फुले लागतात. फुले अत्यंत सुवासिक व आकर्षक असतात. प्रामुख्याने फुलांचा हार, गजरे, माळा, वेण्या तयार करण्यासाठी उपयोग होतो. तसेच फुलदांड्यांचा फुलदाणी आणि पुष्प सजावटीसाठी उपयोग केला जातो. निशिगंध पिकाची लागवड सोपी असून, तिचा लागवड खर्चही कमी असतो. त्यामुळे हे पीक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे. मात्र निशिगंधाच्या भरपूर व उत्तम प्रतीच्या उत्पादनासाठी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. मे महिन्यात, उत्तम निचरा असलेल्या जमिनीत या पिकाची लागवड केल्यास दर्जेदार व भरपूर फुलोत्पादनाची खात्री देता येते. निशिगंध हे कंदवर्गीय फुलपीक असून, या झाडाला शुभ्र पांढरी फुले लागतात. फुले अत्यंत सुवासिक व आकर्षक असतात. प्रामुख्याने फुलांचा हार, गजरे, माळा, वेण्या तयार करण्यासाठी उपयोग होतो. तसेच फुलदांड्यांचा फुलदाणी आणि पुष्प सजावटीसाठी उपयोग केला जातो.

प्रकार व जाती

निशिगंधाची सुट्या फुलांसाठी अथवा दांड्यासाठी लागवड केली जाते. फुलांतील पाकळ्यांच्या वलयांच्या संख्यानुसार व पानांच्या रंगानुसार सिंगल, डबल, सेमी डबल व व्हेरिगेटेड असे चार प्रकार पडतात.

सिंगल : सिंगल प्रकारच्या निशिगंधाची फुले अतिशय सुवासिक असतात. त्यांचा उपयोग सुवासिक द्रव्यांसाठी तसेच हार, माळा, गजरे तयार करण्यासाठी केला जातो. याच्या फुले रजनी, अर्का श्रृंगार, अर्का प्रज्वल, अर्का निरंतरा व स्थानिक सिंगल सुधारित जाती आहेत.

डबल : डबल प्रकारचा निशिगंध प्रामुख्याने फुलदांड्यासाठी वापरतात. तुलनात्मकदृष्ट्या डबल प्रकार हा सिंगल निशिगंधापेक्षा कमी सुवासिक असतो. डबल प्रकारातील फुलामध्ये ३ पेक्षा जास्त पाकळ्यांची वलये असतात. याच्या सुवासिनी, स्थानिक डबल या जाती आहेत. सेमी डबल : या प्रकारात ३ पेक्षा कमी व एकपेक्षा जास्त पाकळ्यांची वलये फुलामध्ये असतात. फुलदांड्यांसाठी या जातीचा वापर होतो. या प्रकारात अर्का वैभव ही सुधारित जात आहे. व्हेरिगेटेड : या प्रकारात निशिगंधाची पाने रंगीत असतात. पानावर पिवळ्या रंगाचा चट्टा मध्य शिरेलगत असतो. या प्रकाराचा उपयोग बागेमध्ये सजावटीसाठी किंवा कुंडीत लागवडीसाठी करतात. लागवडीपासून तीन ते चार महिन्यांच्या कालावधीत फुले काढणीस तयार होतात. निशिगंध फुलांची विक्री प्रामुख्याने सुटी फुले, फुलदांडे व सुगंधी द्रव्ये या उद्देशाने केली जाते. सुट्या फुलांसाठी पूर्ण वाढलेल्या कळ्या किंवा उमललेल्या फुलांची काढणी करावी. दांड्यांसाठी काढणी करताना फुलदांड्यावरील तळाच्या दोन फुलांच्या जुड्यातील फुले उमलल्यानंतर काढणी करावी. असे दांडे जमिनीलगत पानांच्यावर धारदार चाकूच्या साह्याने कापावेत. सुगंधी द्रव्यासाठी पूर्ण उमललेल्या फुलांची काढणी करतात. फुलांची व दांड्यांची काढणी सकाळी ६-८ किंवा सायंकाळी ६-७ च्या दरम्यान करावी. फार उशिरा किंवा कडक उन्हामध्ये फुलांची काढणी केल्यास त्याचा प्रतीवर व साठवणुकीवर विपरित परिणाम होतो. भारतीय बाजारात सुट्या फुलांना खूप मागणी असते, अशी फुले ५-७ किलो क्षमतेच्या कागदाच्या अथवा बांबूच्या खोक्यात भरून विक्रीसाठी पाठवतात. फुलदांड्याच्या १२, २०, ४० दांड्याच्या जुड्या बांधून वर्तमानपत्राच्या कागदामध्ये गुंडाळून किंवा पुठ्ठ्याच्या खोक्यात भरून बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवतात.

दालचिनीची काढणी कशी करावी

दालचिनीचे झाड तोडावे लागत असल्याने काढणीचा हंगाम महत्त्वाचा ठरतो. सर्वसाधारणपणे नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत दालचिनी काढणीचा हंगाम असतो. हा हंगाम जमीन वातावरण व जातीनुसार बदलतो. म्हणूनच आपल्या भागातील हंगामाची निश्चिती करून घ्यावी.

दालचिनी काढणीस तयार फांदीवरील सालीचा एक लहानसा तुकडा चाकूने काप देऊन काढावा. हा सालीचा तुकडा सहजपणे निघून आल्यास साल काढणीसाठी खोड तोडावे. सहजपणे साल न आल्यास १५ दिवसांनी पुन्हा तपासणी करावी. जोपर्यंत सहजपणे साल सुटत नसेल तोपर्यंत झाड तोडू नये. साल सहजपणे सुटत असल्याची निश्चिती झाल्यानंतर दालचिनीची साल काढण्यासाठी झाड तोडावे.दालचिनीची साल सकाळच्या वेळेस काढावी. दालचिनीची निवडलेली फांदी जमिनीपासून २५ ते ३० सें.मी. उंचीवर तोडावी. बाजूच्या हिरव्या लहान फांद्या लगेचच तोडून बाजूला कराव्यात. पाने सावलीत वाळवावीत.

मुख्य खोडाचे ३० सें.मी. आकाराचे तुकडे वेगळे करून साल लगेच काढण्यास घ्यावी. त्यासाठी खोडाच्या दोन्ही बाजूस उभे खोल काप द्यावेत. चाकूची बोथट बाजू या कापांमध्ये घुसवून साल हलवून घ्यावी. त्यानंतर काढावी. साल काढण्याअगोदर सालीवरून ब्रासचा रुळ किंवा चाकूची धार फिरवून साल रगडावी. त्यामुळे वरचा लाकडाचा भुसा सालीवरून निघून जातो. साल काढल्यानंतर ती सावलीत वाळवावी. साल थेट सूर्यप्रकाशात मात्र वाळवू नये. साल काढलेले खोड मात्र उन्हात वाळवावे. सायंकाळी वाळलेल्या खोडावर साल पूर्ववत चिकटवावी. त्यासाठी ती दोरीने खोडावर बांधून ठेवावी. हे साल बांधलेले खोड दुसऱ्या दिवशी सावलीत वाळवावे. तिसऱ्या दिवशी साल खोडावरून सोडून सावलीत वाळविण्यास ठेवावी. साधारण पाचव्या ते सहाव्या दिवशी साल वाळते.

साल सावलीत वाळवल्यानंतर एकदाच दोन तास उन्हात वाळवावी. वाळवताना ती मलमलच्या पिशवीत भरून उन्हात ठेवावी. वाळलेली साल डब्यात हवाबंद करून ठेवावी. एका दालचिनीच्या झाडापासून पाचव्या ते सहाव्या वर्षी सरासरी ३०० ग्रॅम वाळलेली साल व २५० ग्रॅम पाने मिळतात. तोडल्यानंतर दालचिनी झाडाला असंख्य धुमारे फुटतात. हे धुमारे वाढू द्यावेत. त्या धुमाऱ्यापैकी सरळ आणि सशक्त ४ ते ५ धुमारे ठेवून बाकीच्यांची विरळणी करावी.

पशुखाद्यासाठी सागरी वनस्पती

जागतिक पातळीवर सागरी वनस्पतींचा वापर पशुखाद्यामध्ये केल्यास खर्च वाचण्यासोबत चारापिकाखालील जमिनीचे प्रमाण कमी करणे शक्य होईल. मात्र, सध्या जागतिक पातळीवर दुधाळ गायींचे प्रमाण सुमारे १.५ अब्ज इतके आहे. इतक्या जनावरांच्या आहारामध्ये ०.५ टक्के प्रमाणात सागरी वनस्पती पूरक म्हणून देण्याचे नियोजन करावे लागेल. इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये सागरी वनस्पती सागरातून काढणे हे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य वाटते. एकट्या अमेरिकेमध्ये ९४ दशलक्ष जनावरे असून, त्यांच्यासाठीही पूरक आहार म्हणून या वनस्पती मिळवणे अवघड ठरणार असल्याचे मत हिस्टोव्ह यांनी व्यक्त केले.

इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये सागरी वनस्पती मिळविण्यासाठी पुन्हा कृत्रिमरित्या त्यांची वाढ करावी लागेल. कारण, केवळ सागरातून या वनस्पती काढून घेतल्यास सागरी पर्यावरणावर विपरित परिणाम होऊ शकतो. ॲस्पॅरागोप्सिस टॅक्सिफॉर्मिसच्या मिथेन उत्सर्जन कमी करण्याच्या क्षमतेमुळे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. कमी कालावधीसाठी ते कार्यक्षम असल्याचे या अभ्यासातून दिसून आले आहे. मात्र, त्यांचा दीर्घकालीन कार्यक्षमता तपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गायीच्या पचनसंस्थेतील सूक्ष्मजीव या नव्या बदलाला सरावल्यानंतर ही कार्यक्षमता टिकणार का, हा प्रश्न उभा राहतो. जर सागरी वनस्पतीतील संयुगे उदा. ब्रोमोफॉर्म्स पचनसंस्थेतील सूक्ष्मजीवांच्या मिथेननिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये बाधा तयार करू शकले तर उत्तमच राहील. मात्र ही संयुगे उष्णता आणि सूर्यप्रकाशासाठी संवेदनशील आहेत. त्यांची मिथेन कमी करण्याची क्षमता प्रक्रिया आणि साठवणीदरम्यान कमी होऊ शकते.

सागरी वनस्पतींची चव जनावरांना फारशी आवडत नसल्याचे दिसून आले. जेव्हा आहारामध्ये ॲस्पॅरॅगसचे मिश्रण ०.७५ टक्क्यांपर्यंत केले जाईल, तेव्हा जनावरांकडून आहार कमी घेण्याची समस्या उद्‌भवू शकते. जनावरांच्या आरोग्यावर आणि पुनरुत्पादन क्षमतेवरील परिणामांचाही दीर्घकालीन अभ्यास केला पाहिजे. कारण, त्यावरच दूध आणि मांसाच्या दर्जा ठरणार आहे. या अभ्यासासोबत दुधाच्या चवीमध्ये काही फरक पडतो का, हे तपासण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

सरासरी दुधाळ गायीद्वारे ३८० पौंड हरितगृह वायू प्रतिवर्ष उत्सर्जन करते. अमेरिकेत पशुपालनातून उत्सर्जित होणाऱ्या हरितगृहाचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. त्यापेक्षा कितीतरी अधिक पट हरितगृह वायू उत्सर्जन हे ऊर्जा आणि वाहतूक उद्योगातून होते. तरीही दूध आणि आरोग्यावर कोणताही परिणाम न होता मिथेन उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

तंत्र अळू लागवडीचे

अळू लागवडीसाठी भरपूर सेंद्रिय पदार्थ असणारी, मध्यम ते भारी, चांगल्या निचऱ्याची जमीन निवडावी. योग्य मशागत करून जमीन तयार करावी. हे पीक कंदासाठी लावले असेल तर सहा महिने झाल्यावर काढणी करावी. पानांची काढणी २.५ ते ३ महिन्यांत करतात. त्यामुळे लागवड क्षेत्रावर पाण्याची सतत उपलब्धता असावी. जमीन चांगली नांगरून भुसभुशीत करावी. जमिनीत शेणखत मिसळून तीन फुटांवर सरी वरंबे काढावेत.

लागवड जून महिन्यात करावी. लागवडीपूर्वी कार्बेन्डाझिमची (१ ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति लिटर पाणी) बेणे प्रक्रिया करावी. सरीमध्ये ९० सें.मी. अंतर ठेवून कंद लावून मातीने झाकावेत. ताबडतोब पाणी द्यावे. त्यानंतर आवश्यकतेनुसार ३ ते ४ दिवसाने पाणी द्यावे. साधारणपणे एक गुंठ्यासाठी १२० ते १३० कंद लागतात. लागवडीपूर्वी शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. माती परीक्षणानुसार हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद, ८० किलो पालाश द्यावे. नत्र व पालाश खत समान तीन हफ्त्यात विभागून द्यावे. स्फुरद लागवडीच्या वेळी द्यावे. काहीवेळा पिकावर करपा, कोंब कुजणे रोगाचा प्रादुर्भाव दिसतो. नियंत्रणात्मक उपाययोजना म्हणून १ टक्के बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.

पानांची विक्री करायची असल्यास दोन ते अडीच महिन्यांनी तोडणी करावी. पाने देठासहित तोडावीत. पानांची तोडणी ८ ते ९ महिने करू शकतो. अळू कंदासाठी उपयोगात आणायचे असल्यास सहा महिन्यांमध्ये कंद तयार होतात. त्यानंतर काढणी करावी.

जातींची निवड

लागवडीसाठी प्रामुख्याने स्थानिक जातींची लागवड केली जाते. यामध्ये गर्द हिरवी पाने, जांभळसर शिरा व दांडे किंवा फिकट हिरवी पाने असे प्रकार आहेत. अळूचे कंद भाजून अथवा उकडून खातात. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने लागवडीसाठी कोकण हरितपर्णी ही जात निवड पद्धतीने विकसित केली आहे. या जातीची पाने कोवळी असताना भाजीसाठी वापरतात तसेच मोठी पाने वडीसाठी वापरतात. या जातीमध्ये घशाला खवखव करणारा घटक खूपच कमी असल्याने भाजी तसेच शिजवल्याने कंद खाल्यावर घसा खवखवत नाही. या जातीचे हेक्टरी कंदाचे उत्पादन ५ ते ६ टन व पानाचे देठासहित ८ ते ९ टन मिळते. वडी करताना पान फाटत नाही. अळुच्या श्री किरण, श्री रश्मी, श्री पल्लवी, सातमुखी आणि पंचमुखी या जातीदेखील चांगले उत्पादन देतात.